मंगळवार, दि. ९ डिसेंबर २०२५ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक १०६ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886




https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## भ्रष्टाचार करणाऱ्यांनो सावधान, सीबीआयची करडी नजर - सजीष अय्यर

### जालना जिल्हा व्यापारी महासंघाचे भ्रष्टाचार प्रतिबंध व जागरूकता चर्चासत्र

**जालना । प्रतिनिधी -** राष्ट्रीय बँका, पोस्ट ऑफिस, इन्शुरन्स कंपन्या, इन्कम टॅक्स ऑफीस, भविष्य निर्वाह कार्यालय इतर सर्व केंद्रीय कार्यालयात कर्मचारी कुठल्याही कामाच्या मोबदल्यात पैसे मागत असतील तर त्याची तक्रार तुम्ही सीबीआयच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची हेल्पलाइन नंबरवर करू शकता. त्यामुळे भ्रष्टाचार करणाऱ्यांनो सावधान व्हा, सीबीआयची आपल्यावर करडी नजर असल्याचा इशारा सीबीआयच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे अधिकारी सजीष अय्यर यांनी दिला.

जालना जिल्हा व्यापारी महासंघ व केंद्रीय अन्वेषण ब्युरो ( सीबीआय) एसीबी पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने भ्रष्टाचार प्रतिबंध व जागरूकता चर्चासत्राचे आयोजन हॉटेल विजय विलासच्या बँक्वेट हॉलमध्ये करण्यात आले होते.

चर्चासत्रात कार्यक्रमाचे अध्यक्ष मराठवाडा चेंबर ऑफ ट्रेड अँड कॉमर्सचे महासचिव शाम लोया हे होते. प्रस्तावना व्यापारी महासंघाचे अध्यक्ष विनीत सहानी यांनी केले तर महासंघाचे महासचिव संजय दाड, संघटक प्रमुख राजेश राऊत, इंदर तवरवाला, कोषाध्यक्ष विजय राठी व्यासपीठावर उपस्थित होते. सूत्रसंचालन विनोद कुमावत यांनी केले.

सजीष नायर म्हणाले की, केंद्रीय कर्मचाऱ्यांनी भ्रष्ट मार्गाने मालमत्ता जमा केली असेल व त्याची नागरिकांना माहिती असेल तर त्याची सुद्धा तक्रार आपण या कार्यालयाकडे करू शकता. सीबीआय अँटी करप्शन ब्युरो च्या ट्रॅप मध्ये अडकलेल्या कर्मचाऱ्यांना




शिक्षा देण्याचे प्रमाण चांगले आहे असे ही ते म्हणाले. मजबुरीत एखाद्या नागरिकाने एखाद्या कर्मचाऱ्यास लाच दिली व त्याने अँटीकरप्शन ब्युरोला सात दिवसाच्या आत कळवले तर त्याच्यावर कुठलाही गुन्हा दाखल होणार नाही असेही ते म्हणाले.

शाम लोया म्हणाले की, नागरिकाच्या कायद्याच्या अज्ञानाचा सरकारी कर्मचारी कसा फायदा घेतात याचे सोदाहरण त्यांनी स्पष्ट केले. केंद्रीय व राज्य अँटी करप्शन ब्युरोचा भ्रष्ट कर्मचाऱ्यावर अजूनही धाक बसला नसून भ्रष्ट कर्मचाऱ्यास शिक्षेचे प्रमाण फार कमी असल्याची तक्रार उपस्थित व्यापारी वर्गाने सीबीआय अधिकाऱ्याकडे केली. भ्रष्टाचार करणाऱ्या कर्मचाऱ्यावर कठोर शिक्षेची तरतूद करावी व बडतर्फीची कारवाई होत नाही तोपर्यंत या भ्रष्टाचारी लोकांवर कायद्याचा धाक पान २ वर

## बाबा आढाव यांचे निधन

**मुंबई -** सत्यशोधक चळवळीचे कार्यकर्ते, गांधीवादी समाजसेवक, असंघटित मजुरांच्या हक्कासाठी लढणारे ज्येष्ठ नेते बाबा आढाव यांचे निधन झालं. वयाच्या ९५ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाने राजकीय, सामाजिक यासह सर्वच क्षेत्रातून हळहळ व्यक्त केली जात आहे. वंचित आणि असंघटित घटकांच्या हक्कांसाठी लढणारे मौलिक व्यक्तिमत्व आज आपल्यातून निघून गेल्याचे दुःख होत असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. तर प्रस्थापित व्यवस्थेच्या रोषाची तमा न बाळगणारे सामाजिक कार्यकर्ते आणि पुरोगामी विचारांचे खंदे समर्थक डॉ. बाबा आढाव यांची उणीव सदैव भासत राहील, अशा शब्दात जेष्ठ नेते शरद पवार यांनी बाबा आढावांना श्रद्धांजली अर्पण केली.

**ज्येष्ठ समाजसेवक बाबा आढाव यांच्या निधनाचे वृत्त अतिशय दुःखद : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

ज्येष्ठ समाजसेवक बाबा आढाव यांच्या निधनाचे वृत्त अतिशय दुःखद आहे. वंचित आणि असंघटित घटकांच्या हक्कांसाठी त्यांनी सातत्याने संघर्ष केला. त्यांचे आधारस्तंभ म्हणून काम केले. हमाल, रिक्षाचालक, बांधकाम मजुरांना न्याय देण्यासाठी त्यांनी संघटन उभे केले. हमाल पंचायत, एक गाव-एक पाणवठा असे अनेक उपक्रम त्यांनी राबविले. सामाजिक कुप्रथांविरोधात त्यांनी दिलेला लढा हा कायम स्मरणात राहील. महाराष्ट्राला समाजसेवकांची एक थोर परंपरा कायमच लाभली. त्या परंपरेतील एक मौलिक व्यक्तिमत्व आज आपल्यातून निघून गेले. ते कायम स्मरणात राहतील, त्यांचे विचार येणार्या पिढ्यांना प्रेरणा देत राहतील असे म्हणत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बाबा आढाव यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.



**पुरोगामी विचारांचे खंदे समर्थक असलेल्या बाबा आढाव यांची उणीव सदैव भासत राहील : शरद पवार**

आपल्या महाराष्ट्रात प्रागतिक ,कृतीशील विचार मांडून ते आचरणात आणणाऱ्या शिलेदारांची एक मोठी फळी आहे. भूमिका घेताना परिणामांची, प्रस्थापित व्यवस्थेच्या रोषाची तमा न बाळगणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांमध्ये ज्येष्ठ समाजसेवक, पुरोगामी विचारांचे खंदे समर्थक डॉ. बाबा आढाव ह्यांचं नाव आवर्जून घ्यावं लागेल. आज जेव्हा त्यांच्या निधनाचं वृत्त समजलं तेव्हा त्यांचा संघर्षाचा आणि सामाजिक न्यायाच्या लढ्याचा सारा पट डोळ्यासमोरून गेला. 'एकाकी मजदूर' पान २ वर

युवा आदर्श

### एकबार ...

मतदार यादी मध्ये
नाव आमचे दुबार
मतदान मात्र कधी
नाही केले एकबार
निष्क्रिय मी नादार
रे परान्मुख मतदार
मतदान सुट्टीदिवस
घट्टलावू घेई हे दार
तिकडे चाले विवाद
भरगच्च भरे दरबार
दुरुस्ती करुया नंतर
हेचं चालते दर बार
यादीत आहेत दोष
जाणावे हा उपहार
दुरुस्ती केल्यावरती
कसा करी अपहार
नवीन झेंगटचालले
आले एस आयआर
यादीचे शुध्दी करण
म्हणेकरे जिर्णोद्धार
नेमके ऐनवेळी कसे
हरवते कार्ड आधार
अशुध्द राहीलंयादी
होवूनजाई निराधार
जोवर असेलं उधार
तोवर जागे उपकार
सरुनजाताचं उधार
संपून जाई व्यवहार

हेमंत मुसरीफ पुणे
9730306996.

## ग्राहकांना तक्रार नोंदविण्यासाठी ऑनलाईन सुविधा उपलब्ध

### प्र. अपर जिल्हाधिकारी नम्रता चाटे

**जालना । प्रतिनिधी -** जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेचे मुख्य उद्दिष्ट ग्राहकांच्या हक्कांचे संरक्षण करणे आणि त्यांना प्रोत्साहन देणे असे आहे. तसेच ग्राहकांच्या तक्रारींची त्वरित सोडवणूक करणे हे देखील परिषदेचे कार्य आहे. या उद्देशांसाठी, जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेने ग्रामीण भागात विविध माध्यमांद्वारे ग्राहक जनजागृतीसाठी विशेष मोहीम राबवावी. तसेच जालना जिल्ह्यातील ग्राहकांना तक्रार नोंदविण्यासाठी ऑनलाईन सुविधा उपलब्ध असून त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रभारी अपर जिल्हाधिकारी नम्रता चाटे यांनी केले आहे.

जिल्ह्यातील ग्राहकांच्या समस्यांची सोडवणूक करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेची बैठक प्रभारी अपर जिल्हाधिकारी नम्रता चाटे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात संपन्न झाली. यावेळी जिल्हा पुरवठा अधिकारी तथा ग्राहक संरक्षण परिषदेच्या सचिव सविता चौधर यांच्यासह ग्राहक संरक्षण परिषदेचे शासकीय व अशासकीय सदस्य उपस्थित होते.

सध्या अनेक विभागांनी तक्रारी नोंदवण्यासाठी ऑनलाइन सुविधा उपलब्ध करून दिली आहे. ग्राहकांनी या सुविधेचा वापर करून आपल्या तक्रारी ऑनलाइन नोंदवाव्यात. तसेच पळल.क्षरश्रपर या संकेतस्थळावर ग्राहकांच्या समस्यांसाठी पोर्टल उपलब्ध आहे. ग्राहकांच्या हिताशी संबंधित तक्रारी असल्यास त्या ऑनलाइन किंवा ऑफलाइन पद्धतीने सादर कराव्यात, जेणेकरून त्यांच्या समस्यांचे निराकरण लवकरात लवकर केले जाईल. जिल्ह्यात राष्ट्रीय ग्राहक दिनाचे आयोजन दि.२४ डिसेंबर २०२५ रोजी करण्यात येणार असून सर्व सदस्यांनी ग्राहक दिन साजरा



करण्याबाबत आपल्या संकल्पना सांगाव्यात. असेही त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी अशासकीय सदस्यांनी दाखल केलेल्या तक्रारींचे समाधान करुन निराकरणही करण्यात आले.

### कदीम जालना पोलिसांची मोठी कामगिरी

## १७.७६ लाखांचा मुद्देमाल पोलीस अधिक्षकांच्या हस्ते फिर्यादीस परत

**जालना । प्रतिनिधी -** शहरातील शिवशक्ती मिल महानगरपालीका समोर जालना येथे तक्रारदार नरेंद्र गुलाबशहा सावजी, वय ५५ वर्षे, व्यवसाय किराणा दुकान, शिक्षण १० वी, रा. शिवशक्ती दाल मिल समोर, म्हसोबा मंदीर जवळ, जुना जालना हे दिनांक ११.११.२०२५ रोजी दुपारी ०४.०० वाजताचे सुमारास सौरभ सुपर शॉपी या दुकानात साफसफाईचे तसेच काम करण्याचे असल्यांने कुटुंबासोबत राहते घराला कुलुप लावुन गेले असतांना रात्री १० वाजता परत आले असता त्यांच्या घराचे कुलूप तोडलेले असल्याचे त्यांना दिसुन आले तेव्हा त्यांनी घरात जावुन पाहणी केली असता घरातील सामान अस्ताव्यस्त पडलेले दिसुन आले त्यावेळी बेडरुम मधील स्टीलच्या डब्यात मुलाच्या लग्नासाठी ठेवलेले ८,३४,१६१/- रुपये किंमतीचे चांदीचे धातुचे ०७ नग विटकर (ठोकळा) प्रत्येकी सर्व मिळुन ०५ कि.ग्रॅ.



भारत ज्वेलर्स जालना यांच्याकडुन दिनांक १८.१०.२०२५ व दिनांक १९.१०.२०२५ रोजी खरेदी केलेले जु.वा. ९,४२,०००/- रुपये रोख रक्कम त्यामध्ये ५००, २००, १००, ५०, २० व १० रुपये दराच्या भारतीय चलनी नोटा असे एकुण १७,७६,१६१ रुपयेचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोरट्यांने घराचे दरवाजाचे कुलूप तोडुन चोरी केली आहे अशी पोलीस ठाण्याकडे तक्रार प्राप्त झाल्यांने कदीम जालना पोलीस ठाण्याकडे फिर्यादीवरुन कदीम जालना पोलीस ठाणे गुरनं ४७८/२०२५ भारतीय न्याय संहीता कलम ३३१(३),३३१(४), ३०५ (a) प्रमाणे दिनांक १२.११.२०२५ रोजी १८.१३ वाजता दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचा तपास पोलीस उपनिरीक्षक डी.एस. मोरे हे करीत होते. सदर गुन्हा दाखल झाल्यानंतर उपविभागीय पोलीस अधीकारी जालना यांनी घटनास्थळी भेट देवुन मार्गदर्शन केले होते. सदर गुन्हा दाखल झाल्यानंतर गुन्हयाचे तपास अधीकारी व तपास पथकाचे अंमलदार यांनी समांतर तपास करुन तसेच पोलीस ठाणे हददीतील तसेच घटनास्थळाचे जवळील सीसीटीव्ही फुटेज पडताळणी करुन व तांत्रीक विश्लेषण व गोपनिय बातमीदार यांचे आधारे सदरचा गुन्हा आरोपी नामे १) अविनाश अंकुश वाघमारे, वय २४ वर्षे, रा. माळीपुरा, जालना २) यशराज सतीष खांडेबराड वय १९ वर्षे, रा.माळीपुरा जालना यांनी केली असल्याची माहीती मिळवुन पान २ वर

## निकुंज खंडेलवालला ओपन स्केटिंग चॅम्पियन स्पर्धेत सुवर्ण पदक

**जालना । प्रतिनिधी -** जालना येथील ऋषि विद्यालयात कौशल बहुउद्देशीय संस्थेतर्फे आयोजित ओपन स्केटिंग चॅम्पियन स्पर्धेत १२ वर्षांखालील वयोगटात ऋषि विद्यालय एज्युकेशनल स्कूलचा विद्यार्थी निकुंज विष्णु खंडेलवाल याने प्रथम



क्रमांक पटकवून सुवर्ण पदक मिळवले. निकुंजच्या या उत्कृष्ट यशाबद्दल ऋषि विद्यालय एज्युकेशनल स्कूलच्या प्राचार्या डॉ. हेमा सोनटक्के तसेच आयोजकांनी त्याचे अभिनंदन केले.

## संत संताजी जगनाडे महाराज यांना अभिवादन



**जालना । प्रतिनिधी -** संत संताजी जगनाडे महाराज यांची जयंती आज जिल्हाधिकारी कार्यालयात साजरी करण्यात आली. प्र.अपर जिल्हाधिकारी नम्रता चाटे यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी नायब तहसीलदार सतिश तायडे, दिपाली वानखेडे, रविंद्र हेलगट, संपदा कुलकर्णी, मिनाक्षी देवशी, मिना नगरकर, सविता भोकरे, सुनिल काळुंके यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

संपादकीय पान

# उपक्रमांनी घडत जाणारा आमचा चौथीचा वर्ग

आमच्या चौथीच्या वर्गात नवनवीन उपक्रम घेतले जातात. प्रत्येक विद्यार्थी आवडीने उपक्रमात सहभागी होतात.असेच काही निवडक उपक्रम पाहुयात.या वयात मुले उत्सुक असतात, प्रश्न विचारत असतात, नवीन गोष्टी शोधत असतात. म्हणूनच आमच्या वर्गात विविध प्रकारचे उपक्रम घेतले जातात, जे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला मदत करतात. वर्षभर हे उपक्रम सतत सुरू राहतात आणि त्यातून मुलांना अनुभव, ज्ञान, कौशल्ये आणि आत्मविश्वास मिळतो. आमच्या चौथीच्या वर्गात तीन खास उपक्रम आहेत-We Learn English, We Learn Japanese, आणि Selfie with Success. त्यासोबत वर्गसजावट, मातीकाम, सुंदर हस्ताक्षर लेखन, जो दिनांक तो पाढा असे नियमित उपक्रम मुलांच्या दैनंदिन शिकण्याचा भाग आहेत. सर्वांत जास्त आवडणारा उपक्रम म्हणजे 'चला वाचूया'. या उपक्रमामुळे मुलांमध्ये वाचनाची सवय लागते आणि ते पुस्तकांच्या जगात रमून जातात.

**आम्ही इंग्रजी शिकतो** इंग्रजी भाषा जगभर वापरली जाते, त्यामुळे ती शिकणे खूप महत्त्वाचे आहे. पण भाषेला अवघड समजण्याऐवजी आम्ही मुलांसाठी ती सोपी करण्याचा प्रयत्न केला आहे. थश डशरीप एपसश्रळीह या उपक्रमात मुलं छोटे-छोटे वाक्य बोलतात, शब्द जुळवा वाक्य बनवा, अशा साध्या क्रियांमधून इंग्रजी शिकतात.मुलं वर्गात छोट्या गटात बसून इंग्रजी शब्द बोलतात, सोपे संवाद करतात, कविता म्हणतात. या उपक्रमामुळे त्यांना इंग्रजी बोलण्याची भीती राहत नाही. शब्दस्मरण, उच्चार, शब्दसंपदा आणि आत्मविश्वास-हे चारही गुण हळूहळू वाढू लागतात.जेव्हा वर्गात एखादा विद्यार्थी पहिल्यांदा इंग्रजीत एक पूर्ण वाक्य बोलतो, तेव्हा त्याच्या चेहऱ्यावर दिसणारा उत्साह आणि अभिमान पाहून आम्हाला अतिशय आनंद होतो.

We Learn Japanese जपानी भाषा मुलांना खूप वेगळी आणि आकर्षक वाटते. तिचे उच्चार आणि नवीन शब्द हे सगळं पाहून मुले उत्सुक होतात. थश डशरीप गररपिशीश या उपक्रमात मुलांना जपानीतील नमस्कार कसा करायचा, स्वतःची ओळख कशी द्यायची, संख्या, रंग, आणि काही साधी वाक्ये कशी बोलायची हे शिकवलं जातं. जपानी संस्कृतीबद्दलही मुलांना माहिती दिली जाते. मुलांना हे सगळं खूप आवडतं. हे सर्व शिकताना मुलांची स्मरणशक्ती आणि नवीन गोष्टी स्वीकारण्याची क्षमता वाढते.

Selfie with Success लहान मुलांनी केलेली छोटी प्रगतीदेखील मोठी असते. त्यांच्या प्रत्येक यशाचा गौरव केल्यास त्यांचा आत्मविश्वास वाढतो. म्हणूनच आमच्या चौथीत Selfie with Success हा उपक्रम घेतला जातो. या उपक्रमात मुलं एखादं काम चांगलं केल्यावर सर सोबत यशाचा सेल्फी घेतात.

उदाहरणार्थ- एखादा पाढा पूर्ण पाठ झाला. एखादे आव्हान पूर्ण केले. सुंदर अक्षरात पान लिहिले. एखादं पुस्तक वाचून पूर्ण केलं. तर लगेच त्यांचा सेल्फी घेतला जातो. या उपक्रमातुन मुलांना स्वतःचं यश दिसायला मदत होते. यामुळे त्यांची प्रगती त्यांना समजते आणि पुढे आणखी चांगलं करण्याची प्रेरणा मिळते.

**वर्गसजावट** वर्ग म्हणजे विद्यार्थ्यांचं दुसरं घर. म्हणून तो सुंदर, प्रेरणादायी आणि शिकण्यास योग्य वातावरण असावा. आमच्या वर्गातील मुलं वर्गसजावटीचे उपक्रम हर्षोल्हासाने करतात. भिंती सजवण्यासाठी पोस्टर्स, पाठाशी संबंधित चित्रं, असे अनेक फलक मुलं तयार करतात. मुलांच्याकल्पनाशक्तीचा सुंदर उपयोग या उपक्रमात दिसतो. आपल्याच हाताने तयार केलेला वर्ग पाहून मुलांचा आनंद द्विगुणित होतो.

**मातीकाम** मातीशी खेळणं म्हणजे सर्जनशीलतेचं दार उघडणं. मातीकामाच्या उपक्रमात मुलांना मातीपासून वस्तू कशाबनवायच्या हे शिकवलं जातं. काहीजण भांडी, तर काहीजण खेळणी किंवा सजावटीच्या वस्तू तयार करतात. मातीचे मॉडेल बनवताना मुलांची बोटे आणि मेंदू यांचा छान समन्वय साधला जातो. त्यांची एकाग्रता वाढते




आणि एखादी वस्तू स्वतः घडवल्यावर त्यांना अभिमानाची भावना निर्माण होते. अशाप्रकारे मातीच्या माध्यमातून मुलांचे कलागुण फुलतात.

**जो दिनांक तो पाढा** पाढे पाठ करणं मुलांसाठी कधी कधी कठीण होतं. पण जो दिनांक तो पाढा हा उपक्रम ही कठीण गोष्ट खूप सोपी करतो.या पद्धतीनुसार ज्या तारखेला जी संख्या असते, त्या संख्येचा पाढा म्हणायचा. उदा.- ७ तारखेला ७ चा पाढा १५ तारखेला १५ चा पाढा ही पद्धत मुलांना खूप आवडते कारण दिवस पाहून पाढा ओळखायला सोपं जातं. रोजच्या सरावामुळे गणितात गती येते आणि मुलांना पाढ्यांची भीती राहत नाही.

सुंदर आणि स्वच्छ अक्षरात लिहिलं तर शिक्षकांनाही वाचायला सोपं जातं आणि मुलांना लिहिण्यात अभिमान वाटतो. सुंदर हस्ताक्षर लेखन हा उपक्रम या हेतूनं घेतला जातो. मुलांना अक्षरांची उंची-रुंदी, अंतर, ओळींचा वापर, गती या सर्वांचा सराव घेतला जातो. काही दिवसांतच मुलांची अक्षरे सुधारतात. ते स्वतःच आपली वही पाहून खुश होतात.

हा आमच्या वर्गातील सर्वात आवडता उपक्रम आहे. रोज काही वेळ मुलं एकदम शांत वातावरणात आपल्या आवडीचं पुस्तक वाचतात. त्यांना ग्रंथालयातून विविध पुस्तके उपलब्ध करून दिली जातात- महापुरुषांची चरित्रे गोष्टींची पुस्तके कविता माहितीपर पुस्तकं साहसकथा वाचनामुळे मुलांची शब्दसंपदा वाढते, त्यांची कल्पनाशक्ती समृद्ध होते आणि वाचनाची गोड सवय लागते. जेव्हा एखादा विद्यार्थी सर, मी पुस्तक संपवले! असं उत्साहाने सांगतो, तेव्हा त्या क्षणाला वेगळीच चमक असते. उपक्रमांनी सजलेला सुंदर प्रवास इयत्ता चौथीतील या सर्व उपक्रमांमधून मुलांची शैक्षणिक, मानसिक, भावनिक आणि सामाजिक प्रगती होते. ते रोज काहीतरी नवीन शिकतात, स्वतःला व्यक्त करतात, आपल्या क्षमता शोधतात. उपक्रमांमुळे त्यांचा आत्मविश्वास वाढतो, भाषा सुधारते, गणित सोपं होतं, कला फुलते आणि वाचनाची आवड वाढते.आमचा चौथीचा वर्ग म्हणजे उत्साह, आनंद, सर्जनशीलता आणि नवीन शिकण्याचा सुंदर प्रवास.आमच्या शाळेतले उपक्रम मुलांच्या मनाला गोड आनंद देतात आणि त्यांना शिकण्याची गोड सवय लावतात.अशाच नावीन्यपूर्ण उपक्रमांमुळे आम्हाला रोज नवीन काहीतरी शिकायला मिळते.

**विठ्ठल जयवंतराव अनमुलवाड**
**अभिनव विद्या विहार प्राथमिक शाळा,**
**ता.पूर्णा परभणी ९०९६०७५६३०**

## भ्रष्टाचार देशाला लागलेली किड




आजचा दिवस संपूर्ण जगात भ्रष्टाचार विरोधी दिन म्हणून साजरा केला जातो. भ्रष्टाचार ही आज जगातील सर्वात मोठी समस्या बनली आहे. भारतातच नाही तर जगात भ्रष्टाचाराची अनेक प्रकरणे उघडकीस येत आहे. जगात असा एकही देश नाही जिथे भ्रष्टाचार होत नाही. भारतात तर भ्रष्टाचार हाच शिष्टाचार बनला आहे. जगातील सर्वाधिक भ्रष्ट देशांच्या यादीत भारताचा क्रमांक लागतो ही खेद जनक बाब आहे. भ्रष्टाचाराची ही किड भारतात खोलवर रुजली आहे. भ्रष्टाचाराची ही किड देश पोखरत चालली आहे. भारतातील भ्रष्टाचार कमी करणार असे सर्वच राजकीय पक्ष सांगतात. देशातील भ्रष्टाचार संपवणार अशी भीष्म प्रतिज्ञाच काही राजकीय आणि सामाजिक नेत्यांनी केली होती पण देशातील भ्रष्टाचार संपवणे तर दूरच पण देशातील वाढता भ्रष्टाचार कमी करणे देखील यांना जमले नाही. अमेरिकेतील वॉशिंग्टन येथील ग्लोबल फायनांशियल इंटिग्रेटी या भ्रष्टाचारावर सर्व्हे करणाऱ्या संस्थेने मागील वर्षी एक अहवाल सादर केला होता. या अहवालानुसार गेल्या सत्तर वर्षात लाचखोरीमुळे देशाचे ४५० अब्ज डॉलरचे नुकसान झाले आहे. ४५० अब्ज डॉलर ही काही कमी रक्कम नाही. भ्रष्टाचारी लोकांनी देशाचे ४५० अब्ज डॉलर पचवले. हे ४५० अब्ज डॉलर गोरगरिबांच्या मेहनतीचे होते मात्र भ्रष्टाचाऱ्यांनी खुर्ची आणि पदाचा गैरवापर करून गोरगरिबांना फसवले आणि त्यांच्या मेहनतीचे पैसे लाटले. देशाला लागलेली भ्रष्टाचाराची ही किड काही आज लागलेली नाही. देशाच्या स्वातंत्र्यापासून भ्रष्टाचार सुरू आहे. देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू एकदा उद्विग्न होऊन म्हणाले होते की भ्रष्टाचाऱ्यांना सुळावर लटकवले पाहिजे. मात्र आजवर एकाही भ्रष्ट अधिकाऱ्याला किंवा नेत्याला सुळावर लटकावणे तर दूरच पण मोठी शिक्षा झाल्याचेही ऐकिवात नाही. विशेष म्हणजे ज्या भ्रष्ट अधिकाऱ्यांना किंवा नेत्यांना लाचखोरी किंवा भ्रष्टाचारासाठी अटक होते ते नेते किंवा अधिकारी पुन्हा काही दिवसांनी त्याच खुर्चीवर विराजमान झाल्याचे पाहायला मिळतात. अटक होऊन काही दिवसांची शिक्षा भोगूनही भ्रष्टाचारी पुन्हा त्याच खुर्चीवर बसत असल्यानेच भ्रष्टाचार कमी होत नाही. भ्रष्टाचारी समजात उजळ माथ्याने फिरत असतात कारण त्यांना कायद्याची भीती आणि मनाची चाड नसते. दररोजचे वर्तमानपत्र वाचा त्यात तुम्हाला एकतरी लाचखोरीची किंवा भ्रष्टाचाराची बातमी वाचायला मिळेलच. एका एका अधिकाऱ्यांकडे कैक कोटींची अवैध मालमत्ता आढळत आहे. असा एकही विभाग नाही ज्यात भ्रष्टाचार होत नाही. महसूल आणि पोलिस विभाग भ्रष्टाचारात अव्वल असले तरी सर्वच विभागात भ्रष्टाचार सर्रास सुरू आहे. आता तर शिक्षणासारखे पवित्र क्षेत्र देखील भ्रष्टाचाराने बरबटले आहे. जो विभाग समाजाला नैतिकतेचे धडे देतो त्याच विभागात भ्रष्टाचारासारखे अनैतिक काम राजरोसपणे चालू आहे. देशातील भ्रष्टाचार कमी व्हावा यासाठी समाजसेवक अण्णा हजारे, योग गुरू बाबा रामदेव यांच्यासह हजारो कार्यकर्ते दिल्लीच्या जंतरमंतर वर उपषणाला बसले होते. त्यांच्या आंदोलनाला जनतेतूनही मोठा पाठिंबा मिळाला होता. आता सत्तेत असलेल्या भाजपनेही त्या आंदोलनाला पाठिंबा दिला होता. देशभर भ्रष्टाचार विरोधी वातावरण निर्माण झाले होते. त्यावेळी देशातून भ्रष्टाचार कमी होईल असे वाटले होते मात्र भ्रष्टाचार तसूभरही कमी झाला नाही. विशेष म्हणजे त्या आंदोलनाचे नेतृत्व करणारे एक नेते आज भ्रष्टाचार केला म्हणूनच जेलमध्ये आहेत. त्या आंदोलनाचा सर्वाधिक फायदा भाजपला झाला. भाजप केंद्रात सत्तेवर आली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ना खाउंगा... ना खाने दुंगा... असा सज्जड दम भ्रष्टाचाऱ्यांना दिला. देशातील भ्रष्टाचार कमी करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नोटबंदी केली. लोकांना वाटले आता तरी भ्रष्टाचार कमी होईल पण तसे झाले नाही उलट भ्रष्टाचारात वाढच झाली. त्यातही गंमत म्हणजे ज्या भ्रष्टाचाऱ्यांना विरोध करून भाजप सत्तेत आली आज त्याच भ्रष्टाचाऱ्यांना पक्षात घेऊन भाजप पावन करत आहे. ट्रेस मेट्रिक्स २०२१ च्या अहवालात भारत लाचखोरीत इतर देशांच्या तुलनेत खूप पुढे आहे. याचाच अर्थ देशातील भ्रष्टाचार कमी झालेला नाही उलट वाढलाच आहे. आज कोणत्याही कार्यालयात चिरीमिरी दिल्याशिवाय काम होत नाही. जनताही मजबूर आहे. याच मजबुरीचा फायदा घेऊन भ्रष्टाचारी त्यांना जाळ्यात अडकवत आहेत. लाच दिली नाही तर काम होत नाही असाच अनुभव देशातील बहुतांशी जनतेला आला आहे. राजस्थानातील ८० टक्के लोकांनी हे मान्य केले आहे की कोणतेही काम करण्यासाठी लाच द्यावीच लागते. महाराष्ट्रातील ५५ टक्के लोकांचेही हेच म्हणणे आहे. याचाच अर्थ लाचखोरी सामान्य होत आहे. पूर्वी भ्रष्टाचाऱ्यांकडे द्वेष भावनेने पाहिले जायचे आता मात्र त्यांच्या संपत्तीवरून त्यांचा सन्मान होत आहे. आज भ्रष्टाचार हाच शिष्टाचार बनला आहे.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे ९९२२५४६२९५**

# शांतता! पुणेकर वाचत आहे... चळवळ व्यापक व्हावी

गेल्या वर्षी पुण्यामध्ये पुस्तक महोत्सव साजरा करण्यात आला या आधीही दोन वर्ष पुण्यामध्ये पुस्तक महोत्सव साजरा झाला.हे तिसरे वर्ष आहे. लाखाचे वर वाचकांनी त्याला भेट दिली आणि काही कोटींमध्ये पुस्तकांची विक्री झाल्याचे चे वृत्त आपण वाचले होते. होणाऱ्या कार्यक्रमांमध्ये असंख्य रसिकांनी हजेरी दिली. जवळपास ४०० ५०० पुस्तकांची स्टॉल होती. लहान मुलांसाठी स्वतंत्र विभाग होता. आता यावर्षीही या तारखांना पुण्यामध्ये गरवारे कॉलेजच्या पटांगणावर १३ ते २१ डिसेंबर कालावधीत पुस्तक महोत्सव होणार आहे. आता यावर्षी पुस्तकाचे स्ट्रॉंल वाढणार आहेत.

पुणे मुंबई नागपूर अशा ठिकाणी पुस्तक महोत्सव होतीलच पण या व्यतिरिक्त महाराष्ट्रात असंख्य ठिकाणी असे पुस्तक महोत्सव व्हायला हवेत. थोडक्यात वाचकांचे जवळ किंवा समोर पुस्तक जायला हवीत हा या मागचा महत्त्वाचा उद्देश आहे. अर्थातच निरनिराळ्या विषयावरील, आकर्षक मुखपृष्ठ असलेली असंख्य पुस्तके बघितल्यानंतर वाचकांना त्यातून निवडून काहीतरी घ्यावीशी वाटतातच.वाचावीशी वाटतात. अशा पुस्तक महोत्सवाने पुणे मुंबई नागपूर अशा ठिकाणची वातावरण तर पुस्तकांमुळे ढवळून निघतेच परंतु आता ही पुस्तक महोत्सवाची चळवळ संपूर्ण महाराष्ट्रभर पसरायला हवी आहे. दरवर्षी या ठिकाणी असे महोत्सव साजरी करताना त्याचबरोबर इतर जिल्हे आणि त्याचबरोबर तालुका पातळीपर्यंत असे महोत्सव आयोजित करायला हवे. जर आपल्याला वाचन संस्कृती रुजवायची आहे,टिकवायची आहे तर फक्त एवढा संकुचित विचार करून भागणार नाही त्यात व्यापकता यायला हवी. परवाच नागपूर येथे पुस्तक महोत्सवात राष्ट्रीय पुस्तक न्यासाचे अध्यक्ष मिलिंद मराठे यांनी असे मत व्यक्त केले की आता पुस्तक महोत्सवाची व्याप्ती वाढवावी लागणार आहे आणि ती तालुका पातळी पर्यंत नेण्याचा आमचा विचार आहे. तर हे कृतीत उतरायला हवे. अजूनही तालुका पातळीवर पुस्तकाची दुकाने नाहीत असतील तर अगदी अपवादात्मक म्हणावी लागेल.




त्याचबरोबर मला असे वाटले, शांतता ! पुणेकर पुस्तक वाचत आहे.. असे आवाहन न करता,शांतता ! महाराष्ट्र पुस्तक वाचतोय. असे करायला हवे. असा दिवस ठरवताना तो सुट्टीचा दिवस असावा, कारण कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन तसेच शाळा कॉलेज अशा ठिकाणचे वाचक त्यात सहभागी होऊ शकणार नाहीत. आणि खरंतर वर्षभरातून तोही एक तास वाचनाचा ही कल्पना काही योग्य वाटत नाही. अहो ! तुम्ही सुट्टीच्या दिवशी साधारणपणे कितीतरी वेळ बाहेर शॉपिंगला घालवतात, हॉटेलमध्ये घालवतात, आणि मोबाईल मध्ये घालवता. साधारणपणे हा वेळ दोन तीन तासाच्या पुढेच असतो. मग मी तर म्हणेल की दर महिन्याला एका सुट्टीच्या दिवशी किमान दोन ते तीन तास वाचण्यात घालवावे किंवा महिनाभरात किमान एक पुस्तक तरी वाचण्याचा निश्चय करावा तरच काही साध्य होईल. अन्यथा आम्ही काहीतरी वाचतो याचं कौतुक आणि गवगवा निरर्थक. निरर्थक चर्चा जास्त होते. राज्य साहित्य संस्कृती महामंडळ,अ.भा. साहित्य महामंडळ, मराठी साहित्य परिषद, विदर्भ मराठवाडा साहित्य परिषद, मराठी भाषा विभाग आणि राष्ट्रीय पुस्तक न्यास अर्थातच नॅशनल बुक ट्रस्ट यांनी संयुक्त रित्या व्यापकपणे चळवळ राबवून वाचन संस्कृती वाढवण्याचा प्रयत्न करायला हवा. शालेय शिक्षण मंत्री उच्च शिक्षण मंत्री यांनी याबाबतीत पुढाकार घ्यायला हवा.शाळा, काँलेजेस,मधून संस्कार होतील अशा पुस्तकांची ओळख करून द्यायला हवी.

ग्रंथाली वाचक चळवळीने अशाच प्रकारे संपूर्ण महाराष्ट्रात एकाच दिवशी ५० ठिकाणी ५० शहरात एकाच दिवशी पुस्तक प्रदर्शन आणि साहित्यिक कार्यक्रम राबवण्याचा उपक्रम काही वर्षांपूर्वी केला होता. त्याला सर्व दूर फार मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळाला होता.

तुर्त एवढेच.

**दिलीप देशपांडे. जामनेर.**
**जि.जळगांव. ८९९९५६६९१७**

पान १ वरुन

## भ्रष्टाचार करणाऱ्यांनो ...

त्यांच्यावर बसणार नाही, अशी ही व्यापारी बांधवांकडून मागणी करण्यात आली. कार्यक्रमास सीए गोविंदप्रसाद मुंदडा, लक्ष्मीनारायण मानधना, विजय बगडिया, सुभाष देविदान, क्रेडाइ संघटनेचे अध्यक्ष विठ्ठल पवार, चेतन मराठे, पंकज कासलीवाल रविंद्र हुसे, भोसले, लघुउद्योग भरतीचे अध्यक्ष पंकज कासलीवाल, ॲड. महेश धनावत, प्रमोद गंडाल, विनोद पवार, योगेश ठक्कर, शहा आदी उपस्थित होते.

## बाबा आढाव ...

चळवळ, कामगारांच्या हक्कांसाठीची त्यांची अखंड झुंज, समतेवर आधारित समाजरचनेचा त्यांचा ठाम निर्धार अशा सर्व भूमिकांमधून ते सतत प्रस्थापित व्यवस्थेला आव्हान देत राहिले. आजच्या सामाजिक दृष्ट्या अस्थिर, विषमतेने, विद्वेषाने ग्रासलेल्या काळात बाबा आढाव ह्यांच्यासारख्या निडर, विचारांशी बांधिलकी ठेवून काम करणाऱ्या विभूतींची उणीव सदैव भासत राहील. बाबा आढाव ह्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो व आढाव कुटुंबियांप्रती सहवेदना व्यक्त करतो.

**श्रमिक-कष्टकऱ्यांसह वंचित घटकांसाठी लढणारा महान संघर्षयोध्दा हरपला : उपमुख्यमंत्री अजित पवार**

समाजकारणातील निस्पृहता, तळमळ आणि अत्युच्च प्रामाणिकतेचे प्रतीक असलेले ज्येष्ठ समाजसेवक बाबा आढाव यांच्या निधनाचे वृत्त अतिशय दुःखद आहे. श्रमिक, कष्टकरी, दुर्बल आणि वंचित घटकांच्या हक्कांसाठी आयुष्यभर अहोरात्र झटणारा महान संघर्षयोद्धा आज हरपला, अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपल्या शोकभावना व्यक्त करत ज्येष्ठ समाजसेवक बाबा आढाव यांना श्रद्धांजली वाहिली आहे.

हमाल पंचायत, रिक्षा पंचायत, कागद-काचा वेचणाऱ्यांची संघटना अशा विविध संघटनांद्वारे लाखो कष्टकऱ्यांच्या आयुष्यात आशेचा किरण निर्माण करण्याचे कार्य बाबा आढाव यांनी केले. 'एक गाव एक पाणवठा' ही चळवळ त्यांनी उभी केली. सत्यशोधक चळवळीचा विचार आपल्या कृतीतून त्यांनी आयुष्यभर जपला. समाजातील सर्वात तळातील घटकाला न्याय मिळवून देणे, हाच त्यांचा ध्यास होता. संघर्षमय जीवन जगत त्यांनी प्रत्यक्ष कामातून समाजवादाची मूर्त प्रतिमा उभी केली. त्यांचा आशावाद, परखड विचार, निस्वार्थी वृत्ती आणि जनतेशी असलेली नाळ हे महाराष्ट्राच्या सामाजिक चळवळीचे मोठे बळ होते. बाबा आढाव यांचे कार्य म्हणजे समाजहितासाठीचे निर्भीड आणि ज्वलंत आयुष्य कसे असावे, याचे मूर्तिमंत उदाहरण होते. त्यांच्या जाण्याने महाराष्ट्रातील प्रगत, विचारशील चळवळीचे अपरिमित नुकसान झाले असून महाराष्ट्राने समाजसेवेचा महान तपस्वी गमावला आहे, अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बाबा आढाव यांना श्रध्दांजली अर्पण केली आहे.

**बाबा, माझ्यासह अनेकांसाठी प्रेरणास्रोत होते : सुप्रिया सुळे**

आदरणीय डॉ. बाबा आढाव यांच्या निधनाची बातमी अतिशय दुःखद आहे. बाबा, माझ्यासह अनेकांसाठी प्रेरणास्रोत होते. त्यांनी शिव-फुले-शाहू-आंबेडकरी विचारांचा, सत्यशोधकी विचारांचा मार्ग अधिक प्रशस्त केला. या विचारांची शिदोरी बाबांनी आम्हा सर्वांच्या ओंजळीत भरभरुन टाकली. ते अखेरच्या क्षणापर्यंत अगदी आजारपणातही जनतेच्या हितासाठी विशेषतः हमाल, रिक्षाचालक, कामगार, कष्टकरी आणि वंचित समूहाच्या उत्थानासाठी कार्यरत होते. त्यांच्या न्याय्य हक्कांसाठी रस्त्यावर उतरुन संघर्ष करीत होते. या सर्वांसाठी बाबा आढाव हे मोठा आधार होते. त्यांच्या जाण्यामुळे आज सामाजिक चळवळींच्या अवकाशात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. त्यांच्या निधनाने देश एका वैचारीक, सत्वशील, व्रतस्थ आणि अखंड सेवाव्रती नेतृत्वाला मुकला. या कठीण प्रसंगात आम्ही सर्वजण आढाव कुटुंबियांसोबत आहोत. बाबांना भावपूर्ण श्रद्धांजली.

## १७.७६ लाखांचा ...

आरोपी यांस शिताफीने गांधीचमन भागातुन दिनांक १२.११.२०२५ रोजी २२.२७ वाजताचे सुमारास सापळा लावुन ताब्यात घेवुन आरोपीची अंगझडती घेतली असता त्यांने गुन्हयाची कबुली दिली तसेच घरफोडीतील मालमत्ता १७,७६,१६१ रुपये चांदीचे व रोख रक्कम त्याच्याजवळील बॅगमध्ये मिळुन आली होती.

सदर मिळुन आलेला १७,७६,१६१ रुपये रक्कमेचा मुद्येमाल आज रोजी अजय कुमार बसंल पोलीस अधीक्षक जालना यांच्या हस्ते पोलीस अधीक्षक जालना यांच्या कार्यालयात नरेंद्र गुलाबशहा सावजी, वय ५५ वर्षे, व्यवसाय - किराणा दुकान, शिक्षण- १० वी, रा. शिवशक्ती दाल मिल समोर, म्हसोबा मंदीर जवळ, जुना जालना यांना परत करण्यात आली आहे. सदर वेळी फिर्यादीने पोलीसांचे आभार व्यक्त केले आहे.

सदर फिर्यादीस मुद्येमाल परतची कारवाई मा. पोलीस अधीक्षक साहेब यांच्या कार्यालयात अजयकुमार बसंल, पोलीस अधीक्षक जालना, आयुष नोपानी, अपर पोलीस अधीक्षक जालना, अनंत कुलकर्णी, उपविभागीय पोलीस अधीकारी जालना यांच्या मार्गदर्शनाखाली श्री.जे.बी.शेवाळे, पोलीस निरीक्षक, कदीम जालना पोलीस ठाणे, पोउपनि/श्री.डी.एस. मोरे, यांनी केली आहे.

# लाऊडस्पीकर हा धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार नाही

## मुंबई उच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निकाल

**जालना । प्रतिनिधी -** कोणताही धर्म प्रार्थना किंवा धार्मिक कार्यासाठी लाऊडस्पीकरचा वापर अनिवार्य करत नाही, त्यामुळे धार्मिक संस्था लाऊडस्पीकर लावण्याचा हक्क म्हणून दावा करू शकत नाहीत, असा महत्त्वपूर्ण निकाल मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिला आहे. नागरिकांच्या शांततेत जगण्याच्या मूलभूत अधिकाराला सर्वोच्च प्राधान्य देत, न्यायालयाने गोंदिया येथील एका मशिदीची लाऊडस्पीकर पुन्हा लावण्याची याचिका फेटाळून लावली.

**काय आहे प्रकरण?**

गोंदिया येथील 'मस्जिद ए. गौसिया'ने त्यांच्या मशिदीवरील लाऊडस्पीकरचा वापर पूर्ववत करण्यासाठी न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्यावर सुनावणी करताना न्यायमूर्ती अनिल पानसरे आणि न्यायमूर्ती राज वाकोडे यांच्या खंडपीठाने याचिकाकर्त्यांना प्रश्न विचारला की, धर्माचे पालन करण्यासाठी लाऊडस्पीकर लावणे अनिवार्य आहे का? आणि तो हक्क म्हणून मागता येतो का? याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी कोणताही कायदेशीर आधार किंवा पुरावा सादर करू न शकल्याने, न्यायालयाने स्पष्ट केले की लाऊडस्पीकर लावणे हा कोणताही कायदेशीर किंवा घटनात्मक हक्क नाही.

न्यायालयाची महत्त्वपूर्ण निरीक्षणे:

१. शांततेचा अधिकार सर्वोच्च: न्यायालयाने सर्वोच्च न्यायालयाच्या विविध निकालांचा संदर्भ देत म्हटले की, भारतीय राज्यघटनेच्या कलम २१ नुसार प्रत्येक नागरिकाला सन्मानाने आणि शांततेत जीवन जगण्याचा अधिकार आहे. ध्वनी प्रदूषणापासून मुक्त वातावरण हा या अधिकाराचा अविभाज्य भाग आहे.

२. कोणालाही ऐकण्यास भाग पाडले जाऊ शकत नाही: कलम १९(१)(अ) अंतर्गत भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा हक्क अमर्याद नाही. लाऊडस्पीकरच्या माध्यमातून इतरांच्या घरात किंवा मनात जबरदस्तीने आवाज घुसवण्याचा अधिकार कोणालाही नाही. जसा बोलण्याचा अधिकार आहे, तसाच न ऐकण्याचाही अधिकार आहे.

३. कोणताही धर्म ध्वनी प्रदूषण शिकवत नाही: सर्वोच्च न्यायालयाच्या 'गॉड (फुल गॉस्पेल) इन इंडिया विरुद्ध के.के.आर. मॅजेस्टिक कॉलनी वेल्फेअर असोसिएशन' या खटल्याचा संदर्भ देत न्यायालयाने अधोरेखित केले की, कोणताही धर्म इतरांची शांतता भंग करून प्रार्थना करावी, असे सांगत नाही. वृद्ध, आजारी व्यक्ती, लहान मुले आणि अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शांततेच्या अधिकाराचा सन्मान केला पाहिजे.

४. प्रशासनाच्या निष्क्रियतेवर ताशेरे: न्यायालयाने केवळ याचिका फेटाळली नाही, तर नागपूर शहरातील ध्वनी प्रदूषणाच्या गंभीर समस्येची स्वतःहून दखल घेतली. शहरातील क्लब, विवाह स्थळे, आणि विविध धार्मिक स्थळांकडून होणाऱ्या ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियम, २००० आणि पर्यावरण (संरक्षण) कायदा, १९८६ च्या उल्लंघनावर तीव्र नाराजी व्यक्त केली. पोलिसांनी तक्रारीची वाट न पाहता रात्री १० ते सकाळी ६ या वेळेत होणाऱ्या ध्वनी प्रदूषणावर स्वतःहून कारवाई करावी, असे निर्देशही न्यायालयाने दिले.

**हा निकाल म्हणजे नागरिकांच्या हाती असलेले प्रभावी शस्त्र - ड. महेश एस. धनावत**

या निकालावर प्रतिक्रिया देताना जालना नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष, ड. महेश एस. धनावत म्हणाले: मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिलेला हा निकाल अत्यंत स्वागतार्ह आणि ऐतिहासिक आहे. या निर्णयामुळे ध्वनी प्रदूषणाबाबतची कायदेशीर बाजू अधिक स्पष्ट झाली असून, सामान्य नागरिकांच्या हक्कांना बळकटी मिळाली आहे. महाराष्ट्र आणि विशेषतः जालनावासीयांसाठी हा निकाल खालीलप्रमाणे उपयुक्त आहे:

१. नागरिकांचे सक्षमीकरण: अनेकदा नागरिक, विशेषतः विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि रुग्ण, धार्मिक कार्यक्रमांपासून ते लग्न समारंभांपर्यंतच्या आवाजाने त्रस्त असतात, पण काय करावे हे त्यांना कळत नाही. हा निकाल अशा सर्व नागरिकांच्या हाती एक कायदेशीर शस्त्र देतो. आता ते अधिकाराने पोलिसांकडे किंवा प्रशासनाकडे तक्रार करू शकतात.

२. प्रशासकीय स्पष्टता: या निकालामुळे पोलीस आणि स्थानिक प्रशासनाला कारवाई करण्यासाठी एक ठोस आधार मिळाला आहे. आता 'धार्मिक भावना दुखावतील' या सबबीखाली ध्वनी प्रदूषण करणाऱ्यांवर कारवाई करण्यास टाळाटाळ करता येणार नाही.

३. शांततापूर्ण वातावरणाचा हक्क: जालना शहरात आणि जिल्ह्यात अनेक ठिकाणी सण-उत्सव, विवाह सोहळे आणि धार्मिक कार्यक्रमांमध्ये नियमांचे उल्लंघन करून मोठ्या आवाजात संगीत किंवा लाऊडस्पीकर लावले जातात. या निकालामुळे रात्री १० नंतर होणाऱ्या ध्वनी प्रदूषणावर कडक कारवाई करणे शक्य होईल.

४. सर्वांना समान नियम: न्यायालयाने स्पष्ट केले आहे की नियम सर्वांसाठी समान आहेत, मग ते कोणतेही धार्मिक स्थळ असो, क्लब असो किंवा सार्वजनिक कार्यक्रम. कायद्यापेक्षा कोणीही मोठे नाही, हा संदेश या निकालातून मिळतो.

जालना शहरातील आणि जिल्ह्यातील नागरिकांना आवाहन करतो की, आपल्या परिसरात कुठेही ध्वनी प्रदूषणाच्या नियमांचे उल्लंघन होत असल्यास, या निकालाचा आधार घेऊन निर्भयपणे १०-११२ या क्रमांकावर पोलिसांना माहिती द्यावी. तसेच, मी जिल्हा प्रशासन आणि पोलीस दलाला विनंती करतो की, त्यांनी उच्च न्यायालयाच्या निर्देशांचे पालन करून तक्रारीची वाट न पाहता ध्वनी प्रदूषण करणाऱ्यांवर स्वतःहून कठोर कारवाई करावी, जेणेकरून जालना एक शांत आणि निरोगी शहर बनेल.

# मोक्षप्राप्ती म्हणजेच काला - ह.भ.प. प्रकाश महाराज

## गोंदी येथील श्रीदत्तजयंती महोत्सवाची सांगता

**बदनापूर । प्रतिनिधी -** मनुष्य जीवन जगताना जिवंतपणी मोक्ष मिळवता येतो. यासाठी केवळ नामस्मरण हेच साधन असून काला म्हणजे भगवंताने दिलेला आणि याची देही याची डोळा अनुभवता येणारा जीवनमुक्तीचा प्रसाद होय असे प्रतिपादन अध्यात्मरत्न ह.भ.प. प्रकाश महाराज गोंदीकर यांनी श्रीगुरुदत्तधाम येथे श्री दत्तजयंती महोत्सवाच्या समारोप प्रसंगी केले.



श्रीक्षेत्र गोंदी येथे सुरू असलेल्या श्रीदत्तजयंती महोत्सवाची सांगता ह.भ.प. प्रकाश महाराज गोंदीकर यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली. त्यावेळी त्यांनी 'उपजोनिया पुढती येवू' या संत तुकाराम महाराजांच्या अभंगावर विवेचन केले. श्रीदत्तजयंतीच्या निमित्ताने गोंदी येथील दत्त मंदिरात श्री गुरु स्वामी स्तवराज चरित्र व श्रीगुरुचरित्राचे पारायण, गीता विष्णुसहस्त्रनाम पाठ, श्रीदत्तपंचपदी, श्रीमद्भागवत कथा, मराठवाडा नारदीय कीर्तन महोत्सव आदी धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.यात ह.भ.प.प्रदीप महाराज मुळे गोंदीकर यांनी श्रीमद्भागवताच्या सप्तम स्कंधाचे भावपूर्ण विवेचन केले. तसेच मराठवाडा नारदीय कीर्तन महोत्सवात ह.भ.प.सुहासबुवा रामदासी, ह.भ.प. योगीराजबुवा गोंदीकर, ह.भ.प.श्रीपादबुवा गोंदीकर आदी युवा कीर्तनकारांनी नारदीय कीर्तनसेवा समर्पित केली. यासाठी श्रीपाद मुळे, सुहास रामदासी यांनी संवादिनी तर प्रमोद धर्माधिकारी यांनी तबला साथसंगत केली. ह.भ.प.संकेत महाराज सोळुंके यांनी दररोज प्रवचनसेवा सादर केली. गोंदी येथील श्रीगुरुदत्तधाम येथे विराजमान असलेल्या जगातील एकमेव श्री पुष्कराज दत्तमूर्तीस विविध भक्तगणांनी रुद्राभिषेक केला तसेच दररोज सायंकाळी विविध भक्तांनी भजन सेवा सादर केली. श्रीराम संस्थान साडेगावचे महंत प.पु. सुरेश महाराज रामदासी यांची गुरुवारी पाद्यपूजा करण्यात आली.

यावेळी गोंदी परिसरातील बहुसंख्य भाविक भक्त उपस्थित होते. सात दिवस चाललेला हा उत्सव यशस्वी करण्यासाठी श्रीगुरुदत्तधाम परिवारातील सर्व सदस्यांनी अपार परिश्रम घेतले. याबद्दल श्रीगुरुदत्तधाम चे विश्वस्त श्रीपाद मुळे, तथा कार्यवाह योगीराज मुळे गोंदीकर यांनी सर्वांचे आभार मानले आहेत.

# श्रीमाली ब्राह्मण समाजाच्या राष्ट्रीय उपाध्यक्षपदी जयप्रकाश श्रीमाली



**जालना । प्रतिनिधी -** अखिल भारतीय श्रीमाली ब्राह्मण समाज संस्था पुष्करची (राजस्थान) २०२५-२०२८ या कार्यकाळासाठी राष्ट्रीय कार्यकारिणी जाहीर करण्यात आली असून, जालन्यातून जयप्रकाश श्रीमाली यांची राष्ट्रीय उपाध्यक्षपदी निवड झाली आहे. ही बाब जालना जिल्ह्यासह महाराष्ट्रातील श्रीमाली समाजासाठी अभिमानास्पद आहे.

राष्ट्रीय अध्यक्षपदी महेंद्र बोहरा (जोधपूर), वरिष्ठ उपाध्यक्षपदी उदयन व्यास, उपाध्यक्षपदी जयप्रकाश श्रीमाली, कमलेश व्यास, सत्यनारायण अवस्थी, किशोर दवे, मदन अवस्थी, सुरेंद्र दवे, डॉ. जी.डी. दवे, ड. भूषण श्रीमाली, सचिव श्री बृजमोहन व्यास, संयुक्त सचिव नरेंद्रजोग बोहरा, सुनील त्रिवेदी, नवरत्न व्यास, दिलीप दवे, कोषाध्यक्ष राम कुमार बोहरा, संघटन सचिव सागर श्रीमाली, देवकिशन व्यास, गणपतलाल दवे, हरीश व्यास, ललितकुमार ओझा यांची निवड झाली असून विविध राज्यांतील समाजातील मान्यवरांना या कार्यकारिणीत स्थान मिळाले आहे. या निवडीत दक्षिण, पश्चिम व उत्तर भारतातील प्रतिनिधींचा योग्य समतोल साधण्यात आला आहे.

या निवडीबद्दल जालन्यात समाजाच्यावतीने जयप्रकाश श्रीमाली यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी राजेंद्र शर्मा, दिलीप व्यास, दिपेश व्यास, चंद्रप्रकाश श्रीमाली, अंबाशंकर श्रीमाली, रामकुमार श्रीमाली, नटवर व्यास, कन्हैयालाल दवे, प्रकाश व्यास, संजय शर्मा, निलेश ओझा, दिलीप जोशी, गोविंद श्रीमाली आदींची उपस्थिती होती. राष्ट्रीय पातळीवरील या जबाबदारीबद्दल जयप्रकाश श्रीमाली म्हणाले की, ही निवड म्हणजे माझ्या एकट्याची कामगिरी नसून संपूर्ण जालना जिल्ह्यातील श्रीमाली समाजाचा सन्मान आहे. समाजाच्या तरुणांसाठी शिक्षण, व्यवसाय मार्गदर्शन, सांस्कृतिक बांधिलकी आणि राष्ट्रीय स्तरावर सशक्त संघटना निर्माण करण्यासाठी आपण निष्ठापूर्वक काम करणार आहोत. समाजातील प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहोचून नव्या उपक्रमांद्वारे एकता आणि प्रगतीचा मार्ग तयार करणे हेच माझे ध्येय असेल.



# साठ वर्ष जुने विजेचे पोल काढून नवीन बसवा

## माजी नगरसेवक विजय पवार यांची मागणी

**जालना । प्रतिनिधी -** बरवार गल्ली दक्षिण मुखी हनुमान मंदिर जुना जालना येथील ६० वर्ष जुने विजेचे पोल आहेत ते पोल पडायला आलेले आहे या परिसरात लहान मुले बाहेर खेळत असताना तसेच परिसरातील नागरिक बाहेर बसलेले असताना पोलचा तार खाली डोबळलेले आहे त्यामुळे तारीमुळे विजेचे हानी होऊ शकते त्यामुळे जीवीत हाणी झाल्यास त्याची पूर्ण जबाबदारी महावितरण राहील निवेदन भाजपचे माजी नगरसेवक विजय पवार यांनी महावितरण कारल्यात दिले आहे.

# कुंभमेळा तयारीत नाशिकच्या तपोवनातील झाडतोड थांबवावी

## तय्यबबापू देशमुख यांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन

**जालना । प्रतिनिधी -** नाशिक येथील तपोवन परिसरात आगामी कुंभमेळ्याच्या तयारीसाठी मोठ्या प्रमाणावर झाडतोड करण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयाविरोधात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार गट) जालना शहर उपाध्यक्ष तैय्यब देशमुख यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन सादर केले. हे निवेदन जिल्हाधिकारी कार्यालय, जालना मार्फत मुंबई येथील मुख्यमंत्री कार्यालयात पाठवण्यात आले.



निवेदनामध्ये म्हटले आहे की, नाशिकच्या तपोवन परिसरात कुंभमेळ्यासाठी शेकडो झाडे तोडण्याची राज्य शासनाची पूर्वतयारी सुरू आहे. हा निर्णय नाशिकच्या पर्यावरणासाठी, जनतेसाठी आणि विशेषतः शेतकऱ्यांसाठी अत्यंत घातक ठरेल. देशमुख यांनी पुढील मुद्दे अधोरेखित केले तपोवन परिसरातील झाडे नाशिक शहराला मोठ्या प्रमाणात प्राणवायू (ऑक्सिजन) पुरवतात. ती कत्तल केल्यास नागरिकांच्या आरोग्यावर प्रतिकूल परिणाम होईल. झाडतोडीमुळे परिसरातील पावसाचे प्रमाण घटू शकते, ज्याचा थेट फटका शेतकऱ्यांना बसेल. आधीच महाराष्ट्र, विशेषतः मराठवाडा, दुष्काळ आणि शेतकरी आत्महत्यांच्या समस्या झुंजत आहे; अशा निर्णयामुळे परिस्थिती अधिक कठीण होऊ शकते. सरकारने नवीन झाडे लावण्याचा प्रस्ताव ठेवला असला तरी नवीन झाडे विकसित होऊन पर्यावरणीय समतोल साधण्यासाठी किमान ५० वर्षे लागतील. नाशिक तपोवन येथील पाणीसंचयन आणि हिरवाईचा फायदा संपूर्ण मराठवाडा घेतो. पावसाचे प्रमाण कमी झाल्यास तलाव आणि धरणांमध्ये पाणी येणे कमी होईल, ज्याचा परिणाम लाखो नागरिकांवर होईल.

तैय्यब बापू देशमुख यांनी निवेदनात स्पष्टपणे नमूद केले आहे की, परिसरातील झाडे तोडू नयेत; त्याऐवजी कुंभमेळ्यासाठी दुसरी पर्यायी जागा शोधावी. झाडतोडीमुळे शेतकरी, जनता आणि पर्यावरण या तिन्ही गोष्टींचे अपरिमित नुकसान होईल. त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विनंती केली आहे की हा निर्णय पुनर्विचार करून नाशिकच्या तपोवन परिसराचे पर्यावरण वाचवावे. देशमुख यांनी लक्षात आणून दिले की ज्या भागात कुंभमेळा होत आहे त्या परिसरात शेकडो वर्षांची झाडी आहे. ती तोडल्यास स्थानिक हवामानातील आर्द्रता कमी होईल, पावसाचे प्रमाण कमी होऊ शकते, शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठे नुकसान होऊ शकते. नाशिक व मराठवाडा परिसरात होणाऱ्या पाण्याच्या वहनावर परिणाम होईल. त्यामुळे झाडतोडीचा प्रस्ताव तात्काळ मागे घेऊन पर्यायी जागेची निवड करण्याची मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

## श्री संताजी महाराज जगनाडे जयंतीनिमित्त जालन्यात भव्य आरोग्य शिबिरांचे आयोजन

# ५१० नागरिकांनी घेतला लाभ; मुख्यमंत्री सहायता निधीची जनजागृती





**जालना । प्रतिनिधी -** श्री संताजी महाराज जगनाडे यांच्या जयंतीनिमित्त मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय जालना आणि सकल तेली समाज यांच्या वतीने तिळवंत तेली पंचायती वाडा, मोदीखाना येथे भव्य दंतचिकित्सा, नेत्र तपासणी व रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाला स्थानिक नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून एकूण ५१० रुग्णांनी आरोग्य सुविधांचा लाभ घेतला.

**मुख्यमंत्री सहायता निधीबाबत जनजागृती**

शिबिरात आलेल्या रुग्णांना व नागरिकांना मुख्यमंत्री सहायता निधी अंतर्गत मिळणाऱ्या उपचारांसंबंधी सविस्तर माहिती देण्यात आली.

त्वरिता सेवाभावी संस्था (दैठना खुर्द, ता. घनसावंगी) येथील कार्यकर्ते तसेच मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय जालना यांच्या टीम सदस्यांनी जनजागृतीचे काम केले. नागरिकांना देण्यात आलेल्या माहितीपत्रकामध्ये मुख्यमंत्री सहायता निधीत कोणते आजार समाविष्ट आहेत अर्ज कसा करावा, आवश्यक कागदपत्रांची यादी, याबाबत स्पष्ट आणि उपयुक्त मार्गदर्शन करण्यात आले.

शिबिरातील सेवा व लाभार्थी नेत्र तपासणी - ३५० रुग्ण, दंतचिकित्सा सेवा - १३५ रुग्ण, रक्तदान - २५ स्वयंसेवक नागरिकांनी या उपक्रमाचे कौतुक करत तज्ज्ञ डॉक्टरांनी दिलेल्या उपचारसेवा व मार्गदर्शनाचा लाभ घेतला.

**संस्थांचा विशेष सहभाग** या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी जय संताजी युवा मंच, सकल तेली समाज महिला मंडळ, तसेच सकल तेली समाज जालना यांनी विशेष मेहनत घेतली. समाजातील विविध घटकांच्या सक्रिय सहभागामुळे शिबिराचे आयोजन सुरळीतपणे पार पडले.

**आरोग्यसेवा आणि जनजागृतीचा उपयुक्त उपक्रम** संताजी महाराजांच्या जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या या उपक्रमाने जालना शहरातील अनेक नागरिकांना मोफत आरोग्यसेवा उपलब्ध झाली. नागरिकांना सरकारी योजनांची अचूक माहिती देऊन त्यांना योग्य उपचार मिळवण्याचा मार्गही खुला झाला.

# राहत सोशल ग्रुप जालना तर्फे आयोजित मुस्लिम सामूहिक विवाह सोहळयात १४ जोडपे विवाह बध्द

## ग्रुपने गेल्या २४ वर्षात १२०० कुटुंबांच्या विवाह समस्या सोडवल्या - आमदार खोतकर

**जालना | प्रतिनिधी -** राहत सोशल ग्रुप जालना यांनी आयोजित केलेले २४ वे मुस्लिम सामूहिक विवाह आज सकाळी १०:३० ते १२:३० दरम्यान आयेशा लान्स, उर्दू हायस्कूल मागे, कदिम जालना येथे पार पडले. या मुस्लिम सामूहिक विवाहांचे अध्यक्ष नसीम चौधरी चौधरी क्लॉथ सेंटर जालना होते. याप्रसंगी राहत सोशल ग्रुप जालना आयोजित मुस्लिम सामूहिक विवाहात १४ मुस्लिम जोडप्यांचा विवाह झाला. विवाहाचे दस्तऐवजीकरण, स्वीकृती, विवाह प्रवचन आणि प्रार्थना काझी सय्यद अब्दुल वहीद आणि काझी सय्यद अयाज यांनी केली. यावेळी खासदार जालना डॉ. कल्याण काळे यांनी बोलताना सांगितले की, राहत सोशल ग्रुप जालना जिल्ह्यात गेल्या २४ वर्षांपासून सातत्याने मुस्लिम सामूहिक विवाहांचे आयोजन करत आहे आणि आतापर्यंत ६०० हून अधिक मुले आणि ६०० हून अधिक मुलींचे लग्न झाले आहे, त्यामुळे एकूण १२०० कुटुंबातील मुला-मुलींच्या लग्नाचा प्रश्न सुटला आहे. हे कौतुकास्पद आहे आणि राहत सोशल ग्रुप जालना यांना नेहमीच आमचा पूर्ण पाठिंबा राहील. याप्रसंगी माजी मंत्री आमदार अर्जुन खोतकर म्हणाले की, राहत सोशल ग्रुप गेल्या २४ वर्षांपासून जालना जिल्ह्यात मुस्लिम सामूहिक विवाहांचे आयोजन करत आहे. आजच्या महागाईच्या युगात सामूहिक विवाह हे एक आशीर्वाद आहे आणि इस्लाममध्ये साध्या विवाहांना महत्त्व आणि प्रोत्साहन देण्यात आले आहे. राहत सोशल ग्रुप जालना या सल्ल्याचे पालन करत आहे आणि समाजाला अनावश्यक रूढी आणि अंधश्रद्धांपासून वाचवत गरीब, पात्र, मुले आणि मुलींच्या लग्नाची समस्या सोडवत आहे. राहत सोशल ग्रुप जालनाचे अध्यक्ष आणि सदस्य अभिनंदनास पात्र आहेत. या प्रसंगी इतर वक्ते ज्येष्ठ नेते इक्बाल पाशा, फलंब्रीकर महाराज, अयुब खान, अब्दुल रशीद पहेलवान, काझी अब्दुल वहीद आणि इतर होते. या कार्यक्रमाला खासदार डॉ.कल्याण काळे, आमदार माजी मंत्री अर्जुन खोतकर, इक्बाल पाशा, रशीद पहलवान, नसीम चौधरी, अयुब खान, इनायत मामु, बदर बिन सालम बिन समिदा चाऊस प्रदेश उपाध्यक्ष अल्पसंख्याक सेल काँग्रेस ख, विष्णू पाचफुले, शहर प्रमुख शिंदे शिवसेना, मोहन इंगळे, राजू भाऊ देशमुख , डॉ. शकील अहमद खान, संजय मुथा, गणेश सोपारकर, रियाज भाई भंगार वाले, महंमद मोईज, अनस चाऊस, अबूद चाऊस, साईनाथ चिननादोरे , अभय यादव, अब्दुल करीम बिल्डर, अतीक अहमद खान शहराध्यक्ष काँग्रेस आय, फिरोज बागबान, शेख इब्राहिम, डॉ.हारून चाऊस, अमजद खान, कलीम खान, कृष्णा पडोळ, अब्दुल करीम, मुफससीर कुरेशी आदी यावेळी उपस्थित होते. महाराष्ट्र राज्य उर्दू अकादमीतर्फे पुरस्कृत प्राध्यापक अब्दुल रहीम अरमान, दैनिक कामिल याकीन नांदेडचे संपादक महंमद सादिक, आयेशा बरकत अली, अझहर फाजील, शरीफ खान पठाण, यांचे स्वागत व सन्मान करण्यात आला. जालना जिल्हा आणि शहरातील शैक्षणिक आणि अध्यापन सेवांसाठी शाह फैसल अहमद, मुख्याध्यापक अख्तर जहाँ कुरेशी आणि साजिद रंगरेझ यांना सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी व्यापार क्षेत्रातील उत्कृष्ट सेवांसाठी विनित सहानी, मोहन इंगळे आणि नसीम चौधरी यांना सन्मानित करण्यात आले. हाफिज सय्यद इसरार अहमद यांनी पवित्र कुराण आणि नात रसूल मकबूल (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचे पठण करून समारंभाची सुरुवात झाली. राहत सोशल ग्रुप जालनाचे संस्थापक सरचिटणीस लियाकत अली खान यासिर जालनवी यांनी समारंभाचा उद्देश आणि उद्दिष्ट आणि राहत सोशल ग्रुप जालनाचा २४ वर्षांचा इतिहास आणि कामगिरी सविस्तरपणे मांडली. राहत सोशल ग्रुप जालनाने गेल्या २४ वर्षात मुस्लिम सामूहिक विवाहांद्वारे ६०० हून अधिक मुले आणि ६०० हून अधिक मुलींचे लग्न लावले आहे. अशा प्रकारे १२०० मुस्लिम कुटुंबातील मुला-मुलींच्या लग्नाचा प्रश्न सुटला आहे. मुस्लिम सामूहिक विवाहांव्यतिरिक्त, राहत सोशल ग्रुप जालनाने आतापर्यंत जालना जिल्ह्यात विविध क्षेत्रात उल्लेखनीय सेवा देणाऱ्या पाचशेहून अधिक व्यक्तींच्या सेवांना मान्यता देऊन त्यांना पुरस्कार देऊन सन्मानित केले आहे. त्याचप्रमाणे जालना जिल्ह्यात दहावी आणि बारावी वैद्यकीय, अभियांत्रिकी आणि इतर शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यश मिळवल्याबद्दल पाच हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे आणि पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे जेणेकरून उल्लेखनीय यश मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळेल आणि इतर विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळेल. समारंभाचे सूत्रसंचालन करण्याचे कर्तव्य राहत सोशल ग्रुप जालनाचे संस्थापक सरचिटणीस लियाकत अली खान यासिर जालना आणि फिरोज बागबान यांनी उत्तम प्रकारे पार पाडले आणि राहत सोशल ग्रुप जालनाचे संस्थापक अध्यक्ष शेख अफसर शेख जी यांनी कृतज्ञता व्यक्त केली. काझी सय्यद अब्दुल वहीद यांच्या प्रार्थनेने मुस्लिम सामूहिक विवाह संपन्न झाला. यावेळी नवविवाहित जोडप्याला राहत सोशल ग्रुप जालना तर्फे पलंग,बिसतर, भांडी बरतन, आणि इतर जिवनोपयोगी वस्तू भेट स्वरुपात देण्यात आली.



### राहत सोशल ग्रुपचा उपक्रम कौतुकास्पद - खासदार डॉ. काळे

# 'ऑरेंज द वर्ल्ड' वॉकथॉनमधून महिला सक्षमीकरणाचा संदेश




**जालना | प्रतिनिधी -** महिलांचा सन्मान, सुरक्षितता आणि सक्षमीकरणासाठी जगभरात राबवण्यात येणाऱ्या 'ऑरेंज द वर्ल्ड' अभियानांतर्गत रविवार दि. ७ डिसेंबर रोजी जालन्यात इनरव्हील क्लब ऑफ जालना होरायझन, इनरव्हील क्लब ऑफ जालना आणि इनरव्हील क्लब ऑफ जालना सेंट्रल या तीन क्लबच्या संयुक्त विद्यमाने आयोजित वॉकथॉनला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या उपक्रमात महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत सामाजिक बदलाचे सशक्त आवाहन करत महिला सक्षमीकरणाचा संदेश दिला. माजी डिस्ट्रिक्ट चेअरमन वर्षा पित्ती, डिस्ट्रिक्ट ट्रेझरर नेत्रा भक्कड आणि सौ. निर्मला साबू प्रमुख उपस्थितीत वॉकथॉनला सुरुवात झाली. प्रारंभी दानकुंवर विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी महिला सक्षमीकरणावर आधारित एक प्रभावी पथनाट्य सादर केले. महिला आणि मुलींनी स्वतःला अबला न समजता स्वबळावर स्वतःचे रक्षण केले पाहिजे. जर मुली स्वतःचे संरक्षण करण्यास सक्षम असतील, तर घरच्यांनाही त्यांना कोणत्याही क्षेत्रात करियरसाठी पाठवताना चिंता वाटणार नाही आणि त्या यशाची नवी शिखरे गाठू शकतील, हा अत्यंत मार्मिक संदेश या पथनाट्यातून देण्यात आला. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते राजेंद्र प्रसाद मार्गवरून रुक्मिणी गार्डनपर्यंत ही वॉकथॉन काढण्यात आली. यावेळी सहभागी महिलांनी भगव्या रंगाचे परिधान करून महिलांवरील हिंसाचाराविरोधात जनजागृती केली.

सीटीएमके विद्यालय व दानकुंवर विद्यालयाचे विद्यार्थी, शिक्षक तसेच इनरव्हील क्लब ऑफ जालनाच्या अध्यक्षा काजल पटेल, इनरव्हील क्लब ऑफ जालना होरायझनच्या अध्यक्षा हेमा जैस्वाल, इनरव्हील क्लब ऑफ जालना सेंट्रलच्या अध्यक्षा पल्लवी अग्रवाल, होरायझनच्या माजी अध्यक्षा ड. अश्विनी धन्नावत, तिन्ही क्लबच्या पदाधिकारी आणि सदस्य महिला मोठ्या संख्येने या वॉकथॉनमध्ये सहभागी झाल्या होत्या. रुक्मिणी गार्डन येथे वॉकथॉनचा समारोप झाला. समाजातील महिलांना सुरक्षित आणि सन्मानजनक वागणूक मिळावी, यासाठी सर्वांनी कटिबद्ध राहण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.

### जालना शहर महानगरपालिका निवडणूक २०२५

# प्रारूप मतदार यादीतील दुबार मतदार

**जालना | प्रतिनिधी -** राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार जालना शहर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक २०२५ संदर्भातील प्रभागनिहाय प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली होती. १६ प्रभागांच्या प्रारूप मतदार याद्यांमध्ये एकूण ९३३८ नावे दुबार असल्याचे आढळून आले असून दुबार मतदारांची यादी महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहे. तरी सर्व मतदारांनी आपले नाव दुबार मतदार यादीत आहे का हे तपासून पाहावे, व नाव दुबार यादीत असल्यास आपण कोणत्या प्रभागात मतदान करू इच्छिता ते परिशिष्ट एक मध्ये महानगरपालिका कार्यालयास कळवावे, असे आवाहन आयुक्त, श्रीमती आशिमा मित्तल , भाप्रसे जालना शहर महानगरपालिका यांनी केले आहे. मनपा संकेतस्थळः-https://mahaulb.in/MahaULB/home/ulblist/viewmore

# शिष्यवृत्तीतून घडणाऱ्या पिढीमुळे समाजाचा विचार व विश्वास हे दोन्ही स्तर उंचावतील - अंजली धानोरकर

## विद्यार्थ्यांसाठी अनेक दरवाजे उघडे - राजू केंद्रे; आर्थिक दुर्बल घटकातील २६८ विद्यार्थ्यांना ३४ लाख ७० हजाराची कलश सीड्स शिष्यवृत्ती प्रदान





**जालना | प्रतिनिधी -** विद्यार्थ्यांच्या पाठीवर आश्वासक 'लढ' म्हणणारा हात ठेवण्याचं काम जालना एज्युकेशन फाउंडेशन कलश सीड्स शिष्यवृत्तीच्या माध्यमातून करत आहे. शिष्यवृत्ती हा केवळ आर्थिक आधार नसून पुढे जाण्याचा आत्मविश्वास देणारा हात आहे. या शिष्यवृत्तीतून घडणाऱ्या पिढीमुळे समाजाचा विचार व विश्वास हे दोन्ही स्तर उंचावतील. स्वतःच्या क्षमतेवर विश्वास ठेवून करियर करा आणि भविष्यात स्वतः 'देणारे हात' होऊन इतर विद्यार्थ्यांनाही साथ द्या, असा मौलिक सल्ला छत्रपती संभाजी नगर येथील महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणच्या सहआयुक्त अंजली धानोरकर यांनी येथे बोलताना दिला.

कलश सीड्स फाउंडेशनच्यावतीने जालना एज्युकेशन फाउंडेशनच्या माध्यमातून रविवार दि. ७ डिसेंबर रोजी येथील महाराजा अग्रसेन फाउंडेशनमध्ये जिल्ह्यातील आर्थिक दुर्बल घटकातील एकूण २६८ विद्यार्थ्यांना १२ व्यावसायिक कोर्ससाठी ३४ लाख ७० हजाराची शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली, त्याप्रसंगी प्रमुख वक्त्या म्हणून अंजली धानोरकर बोलत होत्या. अध्यक्षस्थानी जालना एज्युकेशन फाउंडेशनचे अध्यक्ष सुनील रायठठ्ठा हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून 'एकलव्य इंडिया फाउंडेशन'चे संस्थापक आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कार विजेते राजू केंद्रे, सामाजिक कार्यकर्ते शंकर भिल्ल हे होते तर व्यासपीठावर कलश सीड्सचे चेअरमन सुरेशबाबू अग्रवाल, सौ. रेखादेवी अग्रवाल, संचालिका सौ. वर्षा अग्रवाल, जालना एज्युकेशन फाउंडेशनचे उपाध्यक्ष प्रा. सुरेश लाहोटी, सचिव सुरेश कुलकर्णी यांची उपस्थिती होती.

श्रीमती धानोरकर यांनी विश्वास प्रणालीवर मार्गदर्शन केले. त्या म्हणाल्या की आपल्या आयुष्याचं खरे नियतीपत्रक हे बाह्य परिस्थितीत लिहिलेलं नसतं, ते आपल्या बिलीफ सिस्टीममध्ये अर्थात विश्वास प्रणालीमध्ये लिहिलेलं असतं, 'मी नाही करू शकत' अशी नकारात्मक भावना हीच अनेकांच्या यशाच्या आड येणारी मोठी भिंत आहे. लहानपणापासून आई-वडील, नातेवाईक, समाज यांच्याकडून मिळणारे संदेश, त्यातून होणारे अनुभव आणि आपण स्वतःशी करत राहणारा स्वसंवाद) यावरच आपली विश्वास प्रणाली उभी राहते, असे त्यांनी सांगितले. लोक काय म्हणतात आणि आयुष्यात काय घडतं, हे आपल्या हातात नसतं; पण आपण स्वतःशी काय बोलतो हे पूर्णपणे आपल्या हातात आहे. त्यामुळे 'मी करू शकत नाही' या वाक्यानंतर 'पण मी प्रयत्न करणारच आणि नक्की यशस्वी होणार' ही ओळ जोडण्याचे होमवर्क आजच सुरू करा, असे आवाहन त्यांनी केले.

राजू केंद्रे म्हणाले की, आज भारतभर आणि जगभरात विद्यार्थ्यांसाठी अनेक दरवाजे उघडे आहेत. विशेषतः ग्रामीण भागातील, वंचित समाज घटकातील आणि पहिल्या पिढीतील शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी या संधींपर्यंत पोहोचणे काळाची गरज आहे. दुर्दैवाने, अनेक विद्यार्थी केवळ पारंपरिक मेडिकल, इंजिनिअरिंग किंवा केवळ स्पर्धा परीक्षांनाच आपले ध्येय मानतात. मात्र, या क्षेत्रांच्या पलीकडेही अशा शेकडो फिल्ड्स आहेत, जिथे आपले विद्यार्थी उत्कृष्ट कामगिरी करू शकतात. विद्यार्थ्यांना या संधींची माहिती देण्यासाठी आणि तिथे पोहोचवण्यासाठी 'एकलव्य' आणि 'केजीएफ' सारखे प्लॅटफॉर्म कार्यरत आहेत. गेल्या आठ वर्षांत 'एकलव्य'च्या माध्यमातून सुमारे दोन ते अडीच हजार विद्यार्थी या प्रक्रियेतून जाऊन नामांकित संस्थांमध्ये दाखल झाले आहेत. याशिवाय बारावीनंतरच्या पदवी, पदव्युत्तर प्रवेश तयारी व मार्गदर्शनासह ग्लोबल स्कॉलर्स प्रोग्राम, सत्यशोधक युथ रिसोर्स सेंटर आदी उपक्रम चालविले जात आहेत, अशी माहिती त्यांनी दिली.

**कलशने विद्यार्थ्यांचे भविष्य घडविण्याचा जेईएफचा मार्ग सोपा केला-रायठठ्ठा**

अध्यक्षीय भाषणात भाषणात सुनील रायठठ्ठा म्हणाले की, गेल्या चार वर्षापासून जालना एज्युकेशन फाउंडेशनने लोकसभागातून शिष्यवृत्ती योजना चालवली. यावर्षी कलश सीड्स फाउंडेशनने शिष्यवृत्ती योजनेचे संपूर्ण दायित्व स्वीकारल्याने आमचा मार्ग आणखी सोपा केला आहे, त्याबद्दल आम्ही आभारी आहोत. जेव्हा भगवंत चॅलेंज देतो त्याबरोबरच आपल्यातील क्षमता विकसित करण्याचे मार्गही तोच दाखवतो. शिष्यवृत्ती हा मदतीचा छोटासा अंश आहे. टॅलेंट असल्यामुळे तुम्ही या शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरला आहात. खूप अभ्यास करून मोठे व्हा आणि तुमच्याप्रमाणेच इतरांनाही मदत करा, असे आवाहन त्यांनी केले.

गरजू विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना पंख देणे हाच

**कलश शिष्यवृत्तीचा उद्देश-वर्षा अग्रवाल**

सौ. वर्षा अग्रवाल म्हणाल्या की, प्रत्येक विद्यार्थी हा भविष्यातील वटवृक्षासारखा असतो. एक छोटे बीज जसे योग्य माती, योग्य वातावरण आणि योग्य संधी मिळाली तर मोठा वृक्ष बनू शकते, त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांच्या हातात संधी येणे गरजेचे आहे, कलश शिष्यवृत्तीच्या माध्यमातून ती उपलब्ध करून देण्याचा आमचा प्रयत्न आहे. उद्योग केवळ नफा कमावण्यासाठी नसतो, तर समाज आणि उद्योग एकमेकांचे पूरक असल्याचे आमचे धोरण आहे. सामाजिक दायित्व ही कलश सीड्सची मूल्यव्यवस्था आहे. व्यक्ती आणि राष्ट्र विकासाची खरी ताकद शिक्षणात असते, आर्थिक परिस्थिति शिक्षणात अडथळा बनू नये हीच कलश सीड्स शिष्यवृत्ती योजनेमागील प्रेरणा असून, जेव्हा तुम्ही मोठे व्हाल, यशस्वी व्हाल - तेव्हा तुम्हालाही कोणाच्यातरी स्वप्नांना पंख द्यावे लागतील. कारण शिक्षण हा विशेषाधिकार नसून प्रत्येक मुलाचा अधिकार आहे, असे सांगून त्यांनी जालना एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक प्रा. सुरेश लाहोटी आणि त्यांच्या कार्यरत टीमचे विशेष आभार मानले.

कलशने दायित्व स्वीकारल्याने

**दरवर्षी विस्तार होईल-प्रा. लाहोटी**

प्रा. सुरेश लाहोटी म्हणाले की, जालना एज्युकेशन फाउंडेशनने गेल्या ४ वर्षात लोकसहभागातून आणि यावर्षी कलश सीड्स शिष्यवृत्ती योजना अंतर्गत असे एकंदरीत ५ वर्षांत १२०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना १ कोटी ५० लाख रुपयांची जेईएफ शिष्यवृत्ती प्रदान केली आहे. गेल्या चार वर्षात राबविण्यात आलेल्या जेईएफएफ शिष्यवृत्ती योजनेतदेखील कलश सीड्सचे मोठे योगदान राहिलेले आहे शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येत असलेल्या २६८ विद्यार्थ्यांचे कोर्स पूर्ण होईपर्यंत नूतनीकरण केले जाणार आहे. या योजनेचे संपूर्ण दायित्व कलश सीड्सने स्वीकारल्याने प्रत्येक वर्षी शिष्यवृत्तीचा विस्तार होत राहील आणि ही योजना दीर्घकाळ चालेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या कार्यक्रमाला जालना शहरातील मान्यवर, नागरिक, शिक्षण प्रेमी, विद्यार्थी आणि त्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरेश कुलकर्णी यांनी केले तर आभार सुनील रायठठ्ठा यांनी मानले.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.